# प्रथम वर्ष कला

# सत्र – १

## मराठी VSC( व्यावसाईक कौशल्य अभ्यासक्रम) –

## मराठी भाषा आणि संगणक १

## श्रेयांक २

Name of the course: **मराठी भाषा आणि संगणक - १**

| Sr | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1. | Description of course | आजचे युग हे संगणकाचे युग मानले जाते. आजच्या काळात मानवी जीवनाचा बहुतांश भाग संगणकाने व्यापलेला आहे. तसेच भारतात संगणकीय व्यवहारांचा बहुतांश भाग हा इंग्रजी भाषेनेच व्यापलेला आहे. संगणकावर स्थानिक भाषा न वापरल्याने भारतीय स्थानिक भाषांचा विकास खुंटू शकतो आणि त्या केवळ बोली म्हणून तग धरून राहू शकतात. संगणकाला कळणारी मराठी भाषा (देवनागरी लिपी) संगणकामध्ये कशी कार्यान्वित करायची आणि युनिकोडप्रणीत मराठी टंकलेखन कसे करायचे याचा प्राधान्याने विचार व्हावा म्हणून हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. मराठी भाषेच्या समयोचित वापरासाठी, संगणकावर हुकूमत मिळवण्यासाठी तसेच संगणकावरील मराठी भाषेचा वापर अधिकाधिक वाढवण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरू शकतो. |
| 2. | Vertical | Vocational Skill Course |
| 3. | Type | Theory + Practical |
| 4. | Credit | 02<br>(1 credit = 15 Hours for Theory in a semester)<br>(1 credit = 30 Hours for Practical in a semester) |
| 5. | Hours Allotted | 45 |
| 6. | Marks Allotted | 50 |
| 7. | Course Objectives | १. मराठी भाषा आणि संगणक यांची मैत्री घडवून आणणे.<br>२. सोशल मीडिया आणि डिजिटल डोमेनशी विद्यार्थ्यांना परिचित करणे.<br>३. विद्यार्थ्यांना स्वतःचे PPT सादरीकरण बनविण्यासाठी सक्षम करणे.<br>४. व्यावसायिक हेतूंसाठी सोशल मीडिया आणि मराठी युनिकोड वापरण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची कौशल्ये विकसित करणे.<br>५. विद्यार्थ्यांना सोशल मीडिया आणि युनिकोड वापर, फायदे आणि जोखीम याबद्दल जागरूक करणे. |
| 8. | Course Outcomes | 1. विद्यार्थी युनिकोड टंकलेखन करू शकतील.<br>2. विद्यार्थ्यांकडे ब्लॉग किंवा सोशल मीडिया खाते प्रभावीपणे सुरू करण्याची आणि चालवण्याची कौशल्ये असतील.<br>3. विद्यार्थी त्यांच्या सादरीकरणाद्वारे वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रगती साधण्यास सक्षम बनतील.<br>4. विद्यार्थी युनिकोड आणि PPTचा वापर फायदेशीर तरीही सुरक्षित मार्गांनी करू शकतील. |
| 9. | Modules | घटक एक : युनिकोड टंकलेखन आणि पॉवर पॉईंट सादरीकरण: परिचय<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | घटक दोन : युनिकोड टंकलेखन आणि पॉवर पॉईंट सादरीकरण- प्रात्यक्षिक<br>(६० मिनिटांच्या ३० तासिका) श्रेयांकन १ | |
| 10. | Text books | N.A. | |
| 11. | Reference books | १. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या विश्वात : दीपक शिकरपूर, उज्ज्वल मराठे, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, २०१७.<br>२. युनिकोड : तंत्र आणि मंत्र, माधव शिरवळकर, संगणक प्रकाशन, पुणे, २०१०.<br>३. युनिकोड व संगणकावर मराठीचा वापर (पुस्तिका), राममोहन खानापूरकर, मराठी अभ्यास केंद्र, ठाणे.<br>४. https://rmvs.marathi.gov.in/48<br>५. मायक्रोसॉफ्ट पॉवरपॉइंट - विकिपीडिया - Wikipedia<br>https://g.co/kgs/KWtcty<br>६. https://drive.google.com/file/d/1exB-EdkNgRj1FJ-0hm9TuimaqqV1SG2Z/view?usp=sharing | |
| 12. | Internal Continuous Assessment: 40% | | Semester End Examination: 60% (वेळ एक तास) |
| 13. | **अंतर्गत चाचणी परीक्षा : २० गुण**<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा /प्रकल्पलेखन / नियत कार्य(Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा<br>उपरोक्त कोणत्याही पद्धतीचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल. (प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन पद्धती) | | |
| 14. | बहिर्गत परीक्षा ३० गुण (वेळ एक तास)<br>• प्रत्येकी १५ गुणांचे तीन प्रश्न विचारावेत. त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही दोन प्रश्न सोडवावेत.<br>• पहिले दोन प्रश्न दीर्घोत्तरी स्वरूपाचे असावेत. प्रत्येक घटकावर १५ गुणांचे अंतर्गत पर्याय असलेले प्रश्न विचारावेत.<br>• तिसरा प्रश्न सर्व घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. (गुण १५) | | |

# प्रथम वर्ष कला

# सत्र – २

## मराठी VSC( व्यावसाईक कौशल्य अभ्यासक्रम) –

## मराठी भाषा आणि संगणक २

## श्रेयांक २

Name of the course: **मराठी भाषा आणि संगणक - २**

| Sr | Heading | Particulars |
|---|---|---|
| 15. | Description of course | मराठी ही अनेक देशांत बोलली जाणारी भाषा आहे जी आजच्या डिजिटल जगात लोकांना जोडते. सोशल मीडिया आपल्या वैयक्तिक आयुष्यात अभिव्यक्त होण्यासाठी महत्वाची भूमिका बजावते. आजच्या डिजिटल युगात युनिकोड लेखन केवळ व्यावसायिक जगात आपल्याला मदत करत नाही, तर वैयक्तिक अभिव्यक्तीसाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक प्लॅटफॉर्म्समध्ये ते आपल्याला उपयोगी ठरते. सोशल मीडिया तसेच वैयक्तिक अभिव्यक्तीमध्ये संप्रेषण कौशल्ये विकसित करण्यासाठी हा अभ्यासक्रम आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य सुधारणे, संगणकाशी मराठीतून मैत्री होणे अपेक्षित आहे. सामाजिक क्षेत्रात आपले कौशल्य सादरीकरणाच्या माध्यमातून दाखवता येणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढवणे आणि स्थानिक क्षेत्रात अत्यंत आवश्यक असलेली धार देणे, राष्ट्रीय आणि जागतिक बाजारपेठांत काम करण्यास विद्यार्थ्यांना तयार करणे, यादृष्टीने या अभ्यासपत्रिकेचा आराखडा तयार केला आहे. |
| 16. | Vertical | Vocational Skill Course |
| 17. | Type | Theory +Practical |
| 18. | Credit | 02<br>(1 credit = 15 Hours for Theory in a semester)<br>(1 credit = 30 Hours for Practical in a semester) |
| 19. | Hours Allotted | 45 |
| 20. | Marks Allotted | 50 |
| 21. | Course Objectives | १. विद्यार्थ्यांना संगणकावर मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्यासाठी प्रवृत्त करणे.<br>२. विद्यार्थ्यांना डीटीपी करण्यास शिकवणे.<br>३. विद्यार्थ्यांना त्यांचे स्वतःचे सादरीकरण युनिकोड माध्यमातून करण्यास सक्षम करणे.<br>४. विद्यार्थ्यांना लेखनाचे विविध ले-आउट शिकविणे. |
| 22. | Course Outcomes | १. संगणकावर मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्याच्या संदर्भात विद्यार्थी जागरूक होतील.<br>२. विद्यार्थ्यांकडे डीटीपी प्रभावीपणे वापरण्याची कौशल्ये असतील.<br>३. विद्यार्थी युनिकोडचा वापर फायदेशीर तरीही सुरक्षित मार्गांनी करू शकतील.<br>४. विद्यार्थी सादरीकरणासाठी अक्षरजुळणी आणि मांडणीचा (layout) वापर करू शकतील. |
| 23. | Modules | घटक एक :<br>डीटीपी(Desktop Publishing), अक्षरजुळणी आणि मांडणी (layout) : परिचय<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १<br><br>घटक दोन : |

| | | |
|---|---|---|
| | | डीटीपी (Desktop Publishing), अक्षरजुळणी आणि मांडणी (layout) यांचा प्रात्यक्षिकासह अभ्यास<br>(६० मिनिटांच्या ३० तासिका) श्रेयांकन १ |
| 24. | Text books | N.A. |
| 25. | Reference books | १. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या विश्वात : दीपक शिकरपूर, उज्ज्वल मराठे, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, २०१७.<br>२. युनिकोड : तंत्र आणि मंत्र, माधव शिरवळकर, संगणक प्रकाशन, पुणे, २०१०.<br>३. युनिकोड व संगणकावर मराठीचा वापर (पुस्तिका), राममोहन खानापूरकर, मराठी अभ्यास केंद्र, ठाणे.<br>४. https://rmvs.marathi.gov.in/48<br>५. मायक्रोसॉफ्ट पॉवरपॉइंट - विकिपीडिया - Wikipedia<br>https://g.co/kgs/KWtcty<br>६. https://drive.google.com/file/d/1exB-EdkNgRj1FJ-0hm9TuimaqqV1SG2Z/view?usp=sharing |
| 26. | Internal Continuous Assessment: 40% | Semester End Examination: 60% (वेळ एक तास) |
| 27. | **अंतर्गत चाचणी परीक्षा : २० गुण**<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा /प्रकल्पलेखन / नियत कार्य(Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा<br>उपरोक्त कोणत्याही पद्धतीचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल. (प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन पद्धती) | |
| 28. | बहिर्गत परीक्षा ३० गुण (वेळ एक तास)<br>• प्रत्येकी १५ गुणांचे तीन प्रश्न विचारावेत. त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही दोन प्रश्न सोडवावेत.<br>• पहिले दोन प्रश्न दीर्घोत्तरी स्वरूपाचे असावेत. प्रत्येक घटकावर १५ गुणांचे अंतर्गत पर्याय असलेले प्रश्न विचारावेत.<br>• तिसरा प्रश्न सर्व घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. (गुण १५) | |